क्रमांक पोआ/कक्ष—४(१४)/क.नि/विविक्षित कामे/३६७२/२०१९

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,

डॉ.दा.नौ.मार्ग, महात्मा फुले मंडई समोर, मुंबई १

करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी शासकीय निवासस्थानांची कमतरता लक्षात घेता जास्तीत जास्त निवासस्थाने निर्माण करण्यासाठी विकास आराखडा २०३४ मधिल तरतूदी, पोलीस विभागाकडे उपलब्ध भूखंडावर निवासी संकूल उभारणे तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करून किफायतशीर निवासस्थाने निर्माण करण्याच्या पर्यायांची पडताळणी करुन वा पोलीस विभागासाठी अधिकाधिक शासकीय निवासस्थाने उपलब्ध होण्यासंदर्भात अन्य काही भूखंडांचा वा मोकळया जागांचा /पर्यायांचा शोध घेऊन,शासन नियमातील तरतूदींच्या अनुषंगाने छाननी करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी यासंदर्भात महसूल विभागातील कामकाज, नगरविकास विभाग व महानगरपालिका कार्यालयातील कामकाज, भूखंड व मिळकती संदर्भातील आराखडे व प्रचलित नियम व कायदयांचे सखोल ज्ञान तसेच नगर रचनाकार, नगरविकास विभागातील त्यासंदर्भातील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव, बांधकामांविषयक नियमांची माहिती असलेले व शासकीय व निमशासकीय सेवेतून अवर सचिव, नगररचनाकार वा समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असलेल्या व्यक्तींकडून व्यक्तींचे अर्ज मागविण्यांत येत आहेत.

सदर कामकाजासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व नियुक्तीच्या अटी/शर्ती व इतर तपशिल बृहन्मुंबई पोलीस दलाच्याwww.mumbaipolice. maharashtra. gov. in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तरी अर्हताप्राप्त इच्छुकांनी त्यांचे अर्ज ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयास (कक्ष—४ (ना.आ.) ला लक्षवेध करून) सादर करावेत.

( नवल बजाज )

सह पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामध्ये सेवानिवृत्त अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता नामसूचिता तयार करणेबाबत.

१. नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तींची संख्या :— ०१ (एक)

२. विविक्षित कामाचे स्वरूप :—

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण—२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या अधिपत्याखाली/ मुंबई पोलीस दलाकडे उपलब्ध असलेल्या निवासस्थानासाठीच्या राखीव भूखंडावर पोलीस दलासाठी किफायतशिर दरात निवासस्थाने उपलब्ध होण्यासाठीच्या पर्यायांची पडताळणी करुन योजनेचे प्रारुप तयार करणे.

२) मुंबई पोलीस दलाच्या ताब्यातील जुन्या, जीर्ण व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करणे संदर्भात विविध पर्यायांची पडताळणी करुन त्यासंदर्भातील प्रक्रिया राबविण्यासाठी मार्गदर्शन करणे.

३) मुंबई विकास आराखडयातील नविन तरतूदी (चटईक्षेत्र निर्देशंक, सीआरझेड क्षेत्रातील आरक्षण, शासकीय वापरासाठीचे भूखंड आरक्षण इ.) चा विचार करुन मुंबईच्या विविध विभागात निवासस्थाने उपलब्ध होण्याच्या पर्यायांची पडताळणी करुन आराखडा तयार करणे.

४) मुंबई पोलीस दलासाठी आरक्षित भूखंडाव्यतिरीक्त महसूल विभाग, महापालीका वा अन्य विभागासाठी आरक्षित भूखंडांचे आरक्षण बदलून मुंबई पोलीस दलासाठी अधिक भूखंड उपलब्ध होण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव तयार करणे.

५) अन्य व्यावसायिक पध्दतीने किफायतशिर दरात अधिक निवासस्थाने उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी, महानगर पालीका, नगरविकास विभाग वा तत्सम प्राधिकरणे वा कार्यालयांशी समन्वय साधून प्रस्तावांचे प्रारुप तयार करणे

**३. नियुक्तीचा कालावधी** :—६ महिने किंवा काम पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत.

**४. देय मासिक परिश्रामिक व भत्ते** :—शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकिर्ण — २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ मधील ड(१)(क) नुसार देय असलेले मासिक परिश्रामिक व भत्ते व ड(३) नुसार देय असलेला प्रवास भत्ता व दैनिक भत्ता.

५) अटी/शर्ती

१. उमेदवार शासनाच्या सेवेतून अवर सचिव /कक्ष अधिकारी /नगररचनाकार वा समकक्ष पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

२. उमेदवारास महसूल विभागातील कामकाज, नगरविकास विभाग व महानगरपालिका कार्यालयातील कामकाज, भूखंड व मिळकती संदर्भातील आराखडे व प्रचलित नियम व कायदयांचे सखोल ज्ञान ,विकास आराखडयातील आरक्षणे व त्यासंबंधित नियम तसेच नगर रचनाकार, नगरविकास विभागातील त्यासंदर्भातील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव, बांधकामांविषयक नियमांची माहिती व सखोल ज्ञान असावे. तसेच तो शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा व त्यामध्ये प्रस्तावित सेवेसाठी आवश्यक ती क्षमता असावी.

३. उमेदवाराविरूध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू किंवा प्रस्तावित नसावी, त्यास कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. उमेदवाराचे मुंबई शहर अथवा उपनगरातील राहणारा असावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी निवड करण्याची असल्याबाबत त्यास शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील अ(४) नुसार बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक आहे.

८. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयात काम करावे लागेल.

९. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्या नियंत्रणाखाली कामकाज करतील व ते त्यांना केलेल्या कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१०. वरिल व्यतिरिक्त शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ निर्णयातील नमूद इतर सर्व अटी व शर्तीही त्यांना लागू राहतील.

६. उपरोक्त प्रमाणे आवश्यक ती अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२—२२६२५०२९ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही तसेच त्या संदर्भात केल्या जाणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

७. उपरोक्त प्रमाणे अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही.  तसेच अशा अर्जांना कोणतेही उत्तर/प्रतिसाद दिला जाणार नाही.

८. मुलाखतीव्दारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची नामसूचिका तयार करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचे संपूर्ण अधिकार सह पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई यांना राहतील.

————

# <u>अर्जाचा नमुना</u>

पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसाठी अधिकाधिक निवासस्थाने उपलब्ध होण्याकरिता पर्यायी योजना तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागाराच्या नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने<br>अलीकडील<br>काळातील<br>स्वत:चे छायाचित्र<br>येथे चिकटवावे. |

१ अर्जदाराचे संपूर्ण नाव :—

२ अर्जदाराच्या निवासाचा पत्ता :—

३ सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :—

४ भ्रमणध्वनी क्रमांक :—

५ जन्मदिनांक व वय :—

६ पदासाठी विहीत केलेली अहर्ता अर्जदाराकडे आहे काय? :—

७ मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान आहे का ? :—

८ विभागीय चौकशी /शिक्षा चालु किंवा :—

प्रस्तावित आहे का?

९ अनुभव/इतर प्राविण्य इत्यादी :—

पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्या कार्यालयात " सेवानिवृत्त अधिकाऱ्याची " पदी करार पध्दतीने नियुक्ती करावयाची जाहिरात व www.mumbaipolice.maharashtragov.in या संकेतस्थळावरील माहिती, सूचना तसेच अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:—

दिनांक:—

अर्जदाराची स्वाक्षरी